**कृपया प्रसिध्दीसाठी** **17 मे 2012**

## अंदमानचे कारागृह सावरकर जयंतीला खुले राहाणार

**मुंबई, गुरुवार:** माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांच्या विनंतीवरुन अंदमानचे कारागृह स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीदिनी म्हणजे 28 मे रोजी राष्ट्रभक्त पर्यटकांसाठी खुले ठेवण्याचा निर्णय झाला आहे. श्री. नाईक यांनी आज एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

अंदमानचे कारागृह हे देश-विदेशातील सर्वच पर्यटकांचे आवडते राष्ट्रीय स्मारक आहे. याच कारागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर व त्यांचे बंधू तसेच देशभरातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांना ब्रिटीशांनी बंदीवान केले होते. सावरकरांना तर दोन जन्मठेप भोगण्यासाठी इथे पाठविण्यात आले होते. त्यामुळे भारतीय पर्यटकांना तर ते कारागृह हे एखाद्या राष्ट्रीय मंदिरासारखे वाटते. सावरकरांच्या कोठडीचे दर्शन घेऊन तिथे दरवर्षी हजारो भारतीय नतमस्तक होतात. यंदाही सावरकर जयंती दिनी म्हणजेच 28 मे रोजी तिथे जाण्याची अनेकांची इच्छा होती. तथापि, त्याच दिवशी सोमवार येतो व नियमांनुसार हे स्मारक नेहमीच सोमवारी बंद असते. काही सावरकर भक्तांनी ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर श्री. राम नाईक यांनी तातडीने अंदमानचे नायब राज्यपाल तसेच स्मारक संचालकांशी संपर्क साधला. राष्ट्रीय भावना लक्षात घेऊन एक विशेष बाब म्हणून सोमवार असतानाही सावरकर जयंती निमित्त श्री. राम नाईक यांनी सुचविल्याप्रमाणे स्मारक पर्यटकांसाठी खुले ठेवण्यात येईल असे अंदमानच्या कला व सांस्कृतिक संचालकांनी कळविले आहे.

**(कार्यालय सचिव)**

**संलग्न: पत्र**

F.No.5-8/NM/A&C/2002/427

अंडमान तथा निकोबार प्रशासन

Andaman & Nicobar Administration

कला एवं संस्कृति निदेशालय

Directorate of Art and Culture

Telefax:03192-232637/230117/231463

**************

Port Blair, Dated 8th May 2012

To,

Shri Ram Naik,
Former Petroleum Minister &
National Convener,
BJP MPs-MLAs Development Cell,
Mumbai - 400 063

Sub: - Keeping National Memorial open on Monday on the occasion of Jayanti of Swatantrya Veer Savarkar.

Sir,

Kindly refer your letter dated 2nd May 2012 addressed to the Hon'ble Lt. Governor, A&N Islands on the subject cited above and to inform that Museums of the Cellular Jail will remain open on Monday i.e.28th May 2012 as a special case to facilitate all visitors to pay tribute to Swatantrya Veer Savarkar on his Jayanti .

श्री. राम नाईक
का जनसंपर्क कार्यालय-मुंबई
17 MAY 2012
Office of
Shri Ram Naik - Mumbai

Yours Faithfully,

(Lucas Robert) 8/5/12
Director (Art & Culture)

Copy to:-

1. PA to Commr & Secretary (A&C) for kind information of Commr & Secretary (A&C).
2. PA to Secretary to LG, Raj Niwas for kind information of Secretary to LG.

Director (Art & Culture)